# क्विक हील फाउंडेशनच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

## पाटकर-वर्दे महाविद्यालयाचे 'सायबर वॉरियर्स' संस्कारधाम विद्यालयात

**मुंबई (वाशी समाचार)**

वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरता यावे, यासाठी संस्कारधाम विद्यालय इंग्लिश स्कूलमध्ये क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावी सायबर सुरक्षा जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत डिजिटल सुरक्षेचे महत्त्व जाणून घेतले.

क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रमुख अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची यंदाची संकल्पना 'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी' अशी होती. वैयक्तिक माहितीचे संरक्षण, ऑनलाइन जबाबदारी आणि सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

पाटकर-वर्दे महाविद्यालयातील प्रशिक्षित सायबर वॉरियर्स सिल्पिशिवम सिंग आणि रिया मिश्रा यांनी आकर्षक सादरीकरणाद्वारे विद्यार्थी व शिक्षकांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंची माहिती दिली. डेटा प्रायव्हसी, ऑनलाइन फसवणूक आणि स्कॅम ओळखणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व तसेच सायबर गुन्ह्यांची तक्रार कशी आणि कुठे करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रत्यक्ष घडणाऱ्या सायबर फसवणुकीची उदाहरणे देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमांचा वापर करताना कोणती



काळजी घ्यावी, याची सखोल माहिती मिळाली. संस्कारधाम विद्यालय इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापनाने या उपक्रमाचे स्वागत करत, आजच्या डिजिटल युगात शालेय स्तरावर सायबर साक्षरता निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असे मत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित इंटरनेट वापराची जाणीव निर्माण केल्याबद्दल पाटकर-वर्दे महाविद्यालय आणि क्विक हील फाउंडेशनचे आभार मानले. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय देशभरातील विद्यार्थ्यांना सुरक्षित, जबाबदार आणि सजग डिजिटल नागरिक बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.